# पुणे महानगरपालिका
# स्थायीसमिती
# कार्यपत्रिका क्र. ३५
# सभा क्र. ५०, दिनांक २२/११/२०२२ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची तहकूब सभा (शुक्रवार, दिनांक १८/११/२०२२ रोजीची) मंगळवार दि. २२/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० (अकरा)वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

**वृत्तांत कायम करणे**

मा. स्थायी समिती सभा क्र ४६, दि. ०९/११/२०२२ वृत्तांत कायम करण्यात आला.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्र.१०५०**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/१०/२०२२ ते दि.३१/१०/२०२२ अखेरपर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उपआयुक्त घनकचरा व्यवस्थापन यांचे जा.क्र.घ.क.व्य.का/४०५०, दि. ३/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**उपआयुक्त विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र.१०५१**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ कार्यालयाचे नियंत्रणाखालील हडपसर–मुंढवा, वानवडी–रामटेकडी व कोंढवा–येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/९/२०२२ ते दि. ३०/९/२०२२ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उपआयुक्त परिमंडळ क्र.४, यांचे जा.क्र. उआप/४/४६२०, दि. १/११/२०२२चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र.१०५२**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कार्यालयाकडील कामांच्या दि. १६/१०/२०२२ ते दि. ३१/१०/२०२२ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/८३०, दि. ०७/११/२०२२चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.१०५३**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांच्या अंतर्गत असणाऱ्या कार्यालयाकडील कामांच्या दि. ०१/१०/२०२२ ते दि. १५/१०/२०२२ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/८३१, दि. ०९/११/२०२२चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.१०५४**

दि. १७/१०/२०२२ ते दि. २३/१०/२०२२ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण ३१ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनीजा.क्र. मआ/अग्निशमन/८३७, दि. ९/११/२०२२ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सेवक वर्गाची प्रकरणे**

**विषय क्र.१०५५**

पुणे महानगरपालिका मोटार वाहन विभागाकडील सेवक श्री धनंजय नानासाहेब घुले, हुद्दा– वाहन–चालक (वर्ग–३) यांच्या निलंबन कालावधीस दि. १२/१०/२०२२ रोजी तिसरी सहामाही पूर्ण झालेली असून सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/८३२, दि. ९/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**विषय क्र.१०५६**

क्षेत्रिय आयुक्त परिमंडळ कार्यालय क्र.२ अंतर्गत कार्यरत असलेल्या शिवाजीनगर घोले रोड क्षेत्रिय कार्यालयाच्या ड्रेनेज विभागाकडे कामास व शिवाजीनगर घोलेरोड क्षेत्रिय कार्यालयाकडे वेतनास असलेले श्री . रोहिदास पांडुरंग पाटोळे,हुद्दा–बिगारी यांचे निलंबन कालावधीस दि. २/०४/२०२२ रोजी तिसरी सहामाही संपलेली आहे वदि. ०२/१०/२०२२ रोजी चौथी सहामाही संपलेली असून सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचेजा.क्र. मआ/साप्र/८३३, दि. ९/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषयाची नोंद घेण्यात आली.**

**सर्वातकमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र.१०५७**

सर्व्हे नं. ११४/११५ बाणेर येथे वर्किंग वूमेन हॉस्टेल बांधणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. प्रशांत शशिकांत तळेकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रू. ६३,३७,५१३/– पेक्षा ३०.३३%कमी) असल्याने त्यांचेकडून र.रू. ४४,१५,३४५=३० पर्यंत अधिक जीएसटी र.रू. ११,४०,७५२/– अधिक मटेरियल टेस्टिंग र.रू. १०,१४५/– अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व काम करून घेणेस व करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/८२१,दि. ४/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०५८**

Selection of contractor for mechanized cleaning of public toilets(PT) community Toilets (CT) and urinals using small vehicle mounted High pressure Jetting Machine for a period of three plus Two (extendable) years for zone 1 कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सिद्धिविनायक एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु.१२,०७,३४,५४१=६०पेक्षा–११.९९०कमी) असल्याने मे. लोकराज्य स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था व मे. सिद्धिविनायक एंटरप्रायजेस यांचे ११.९९%कमी इतका समान दर आला आहे. तथापि निविदा अटी शर्तीमधील मुद्दा क्र. १.१.३ मध्ये A contractorwill be appointed for each zone. Each zone will be awarded to one bidder. One bidder can do a maximum of two zone ) प्रत्येक झोनसाठी एक कंत्राटदार नियुक्त केला जाईल. प्रत्येक झोन एका कंत्राटदाराला देण्यात येईल. एक कंत्राटदार जास्तीत जास्त दोन झोन करू शकतो असे नमूद आहे. त्या अनुषंगाने मा. उपआयुक्त परिमंडळ क्र. २ ते ५ यांचेकडे पत्रान्वये ठेकेदाराबाबत विचारणा केली असता मे. लोकराज्य स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था हा ठेकेदार परिमंडळ क्र. ३ व ४ या दोन परिमंडळ कार्यालयासाठी सर्वात कमी दराचे निविदाधारक आहेत. त्यामुळे निविदा अटीशर्तीअन्वये मे. लोकराज्य स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था या ठेकेदाराची शिफारस करता येत नाही. तरी या कामाचेसर्वातकमी टेंडर दराचे ठेकेदारमे.सिद्धिविनायक एंटरप्रायजेस यांचेकडून त्यांचे टेंडर दरानुसारर.रु. १०,६२,५८,४७०=०६२ पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करारनामा करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/८२२,दि. ४/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०५९**

दैनंदिन पाणीपुरवठा सुरळीत ठेवणेसाठी प्रभाग क्र.२ ( नागपूर चाळ– फुलेनगर )प्रभाग क्र. ६ (येरवडा) व प्रभाग क्र. २० (ताडीवाला रोड–ससून हॉस्पिटल) येथे व्हाल्व्ह चालू बंद करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. शर्मा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.८४,२५,६६०/–पेक्षा०.००१% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. ८४,२५,७४४=२५ अधिक शासकीय कामगार किमान वेतन दराप्रमाणे होणाऱ्या वाढीनुसार होणाऱ्या रक्कमे पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/८२३, दि. ७/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०६०**

स्वारगेट कार्यालय क्र.१ अंतर्गत येणाऱ्या अप्पर–इंदिरानगर, महेश सोसायटी, जागडेनगर, प्रसन्न सोसायटी इत्यादी भागात व्हाल्व्ह चालू बंद करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शंकर लिंग एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु.३९,५९,३०४/–पेक्षा ४.८०%जास्त ) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४१,४९,३५०=५९ची निविदा मान्य करून दि. १५/७/२०२२ पासून( ब पाकिट उघडल्याच्या दिनांकापासून ) काम करून घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/८२४, दि. ७/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०६१**

औंध क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत बालेवाडी बाणेर औंध व बोपोडी भागात दूषित पाण्याच्या निवारणे विषयक व पाणीपुरवठा सुधारण्यासाठी पाण्याच्या लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. शिवम एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु.२६,७७,८१९/–पेक्षा १५.३८०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४,०७,८७४=६७ असे एकूणर.रू. २६,७३,८४५=११ चे काम उपलब्ध रक्कमे पर्यंत काम करूनघेऊनत्यांचेशीकरारनामाकरणेसमान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/पापु/८२५, दि. ७/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०६२**

नाला विकसन करणे, कल्व्हर्ट बांधणे, पावसाळी व ड्रेनेजलाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे (रि–इनस्टेटमेंट करणे ) पथपूर्व भाग–२ कामीटेंडर्स मागविली असता आलेल्या १२ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आदर्श भारत एन्व्हायरो प्रा.लि. यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे( टेंडर र.रु.२,६६,७९,८९५/–पेक्षा २८.५५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,९०,६२,७८४=९८ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र. रू. ३४,३१,३०१=२९ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ५१,२१०/– (असे एकूण र.रू. २,२५,४५,२९६=२७)पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/८२७,दि. ७/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०६३**

ऊरूळी कचरा डेपो येथे सोलर प्रकल्प उभारणेकामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.पीईसी पॉवर इन्फ्रा प्रा.लि. यांचे एकच टेंडर आले (पु.ग.प.र.रू. ५७,०४,८५०/– (१८%जीएसटी सह) मधील निविदा र.रु.४८,३४,६१९/–(अधिक १८%जीएसटी ) पेक्षा ००.५५ % कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४८,०८,०२८=६० अधिक १८% जीएसटी र.रू. ८,६५,४४५=१४ असे एकूण र.रू. ५६,७३,४७३=७४( १८%जीएसटी सह ) पर्यंतकाम करूनघेणेस, त्याप्रमाणेत्यांचेशीकरारनामाकरणेसव त्यानुसार केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/८२९,दि. ७/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०६४**

प्रभाग क्र.२३ मध्ये ससाणेनगर काळे बोराटे नगररोड वरील स.नं. २९/२/अ/२ पैकी क्षेत्रफळ ९२५.२१ चौ.मी. २९/१/९ पैकी क्षेत्रफळ ५२८ चौ.मी. स.नं. २६/१/५ पैकी क्षेत्रफळ १३८७.२५ चौ.मी. पुणे मनपाशाळेसाठी आरक्षित जागेवर सेमी इंग्लिश शाळा बांधणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. आनंद बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर यांचेटेंडर सर्वात कमी रकमेचे ( टेंडर र.रु. २९,३६,८२९/– पेक्षा२६.५०%कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२१,५८,५६९=३१ अधिक जी.एस.टी. र.रू. ५,२८,६२९/– अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. २०,४९०/– अधिक रॉयल्टी चार्जेस र. रू. १०,८०९/–पर्यंत टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ(स्टार रेट) सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस त्यापोटी त्यांचेशी करारनामा करून काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/८३५, दि. ९/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०६५**

प्रभाग क्र.३१ स.नं.९ कर्वेनगर येथील योगा हॉलचे उर्वरित कामे पुर्ण करणेकामीटेंडर्स मागविलीअसताआलेल्या४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.एस. शेंडे यांचेटेंडर सर्वातकमीरकमेचे( टेंडर र.रु. ६६,५३,७२१/– पेक्षा२१.२२%कमी) असल्यानेत्यांचेकडूनर.रु. ५२,४१,८०१=४०पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रू. ७,९८,४४७/–पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रू. ४७,५२५/– अधिक टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सूत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व काम करून घेणेस व करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/८३६, दि. ९/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०६६**

पुणे महानगरपालिकेच्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय कमलानेहरू येथे बायोकेमेस्ट्री करिता केमिकल, ग्लासवेअर व प्लास्टिक वेअर खरेदी करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी लघुत्तम दर सादर करणारे ठेकेदार १. आर.एस. एंटरप्रायझेस, २. श्री. एंटरप्रायझेस या दोन निविदाधारकांकडून खात्याच्या आवश्यकतेनुसार व मागणीनुसार जीएसटी करासहित रक्कम रूपये १,४२,२४,२८३/– पर्यंत खरेदी करणेकामी, त्यांच्याशी आवश्यक तो करारकरणेस व खाली नमूद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांची बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/८३८, दि. ९/११/२०२२ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२२–२०२३

CE17A242/SJ6-93

पुणे महानगरपालिकेच्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय

कमला नेहरू येथे बायोकेमेस्ट्री करिता केमिकल, ग्लासवेअर व प्लास्टिक वेअर साहित्य खरेदी
मान्य तरतूद रक्कम रूपये १००,००,००,०००/– ( अक्षरी रक्कम रूपये शंभर कोटी फक्त )
पैकी र.रू. १,४२,२४,२८३/– (अक्षरी रक्कम रूपये एक कोटी बेचाळीस लक्ष चोवीस हजार दोनशे त्र्याऐंशी फक्त)

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**मागीलसभेचे विषय**

**विषय क्र. १०६७**

१५ व्या वित्तीय आयोग अंतर्गत पुणे महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या निधीमधून पुणे शहरातील घनकचरा व्यवस्थापन करणे करिता टिपर खरेदी करणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. एक्सेल व्हेईकल्स अ युनिट ऑफ माय कार पुणे प्रा.लि, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे ( पु.ग.प. र. रु. ५,८७,८२,३७५/– पेक्षा २५.६० % जास्त व पूर्व गणनपत्रक (ज्यामध्ये जीएसटी चा समावेश आहे) रक्कमेपक्षा (+) १६.१७ % जास्त) असल्याने १ नग करिता रक्कम रू. १९,२९,०३७=४१ (जीएसटी अतिरिक्त १८ %) नुसार रक्कम रू. २२,७६,२६४=१४ जीएसटी, वाहतूक, आरटीओ, रजिस्ट्रेशन या सर्व खर्चासह याप्रमाणे ३० नग ९ क्यू. मी. क्षमतेचे टिपर करिता र.रू. ५,७८,७१,१२२=२८ (जीएसटी अतिरिक्त १८ %) नुसार र.रु. ६,८२,८७,९२४=२९ जीएसटी, वाहतूक, आरटीओ, रजिस्ट्रेशन या सर्व खर्चासहखरेदीकरणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (इ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/६८४, दि. २९/९/२०२२ चे पत्र.

( टीप – सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. ९/११/२०२२ च्या सभेत ठरले होते. )

**निर्णय– सदर विषयाचा विचार आठ दिवसांनी करण्यात यावा.**

**संकीर्ण**

**विषय क्र.१०६८**

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडीट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डि.पी. रस्ते व पुल खाजगी सहभागातून विकसित करणे अंतर्गत महंमदवाडी स.नं. २६,२७,३७ मधील २४ मी डी.पी. रस्ता व कल्व्हर्ट बांधणे व महंमदवाडी स.नं. ३८,४०,४१,५५,५६ मधील ३० मी. डी. पी. रस्ता विकसित करणे या कामासाठी निविदा प्रसिद्ध करणे व पोस्ट टेंडर ॲक्टिवीटीकरिता तज्ञ सल्लागार नेमणूककरणेचेअंदाजित खर्च र.रू. २६,३०,९०,०९४/– हाती घेणेस मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा. आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/८२६,दि. ७/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०६९**

पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये सन २०२२–२३ या शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या इ. १० वी व इ. १२ वी (वाणिज्य व विज्ञानशाखा) च्या विद्यार्थ्यांची महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांना भरावयाचे परिक्षा शुल्क माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या नावे आरटीजीएसद्वारे देणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा. आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/माध्यमिक व तांत्रिक शि/८२८,दि. ७/११/२०२२ चे पत्र.

१. पुणे महानगरपालिका संचलित कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इ. १२ वीच्या परीक्षेस एकूण ४३० विद्यार्थी प्रवेशित झाले असून त्याप्रित्यर्थ र.रू. २,०३,०८५/– (नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय – र.रू. १,०८,७२०/– श्रीमती सावित्रीबाई फुले प्रशाला –र.रू. १९,३५०/– कै. बाबुराव सणस प्रशाला – र.रू. १२,१५०/– रफी अहमद किडवाई उर्दू विद्यालय – र.रू. ३५,६४०/– स्वा. से. हकीम अजमल खान उर्दू विद्यालय– र.रू. २७,२२५/– ) संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांना आरटीजीएसद्वारे आदा करणेस,
२. इ. १० वी मध्ये ४३ माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या हि ३७९४ असून त्यापैकी ३६९५ या विद्यार्थ्यांसाठी प्रती विद्यार्थी र.रू. ४३५/– प्रमाणेर.रू. १६,०७,३२५/–( सोळा लाख सात हजार तीनशे पंचवीस फक्त ) व त्यापैकी उर्वरीत तंत्र शाळेतील ९९ विद्यार्थी असून प्रति विद्यार्थी परीक्षा शुल्क र.रू. ५२५/– याप्रमाणे र.रू. ५१,९७५/– ( एकावन्न हजार नऊशे पंचाहत्तर फक्त) असे मिळून एकूण र.रू. १६,५९,३००/– ( र.रू. सोळा लाख एकोणसाठ हजार तीनशे रूपये फक्त )महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे परीक्षा शुल्क भरणेकामी सदर रक्कम संबंधित ४३ माध्यमिक शाळांना आरटीजीएसद्वारे अदा करणेस,
३. इ. १० वीव इ. १२ वी मध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अंदाजित असल्याने उपरोक्त रकमेपेक्षा कमी/अधिक होणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास,
४. एकूण ४३० विद्यार्थ्यांसाठी इ. १२ वीच्या परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळ, पुणे यांचेकडे भरावयाचे शुल्क र.रू. २,०३,०८५/– (दोन लाख तीन हजार पंच्याऐंशी रूपये फक्त) आणि इ. १० वीच्या विद्यार्थ्यां प्रित्यर्थ महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेकडे भरावयाच्या शुल्कापोटी एकूण र.रू. १६,५९,३००/– ( र.रू. सोळा लाख एकोणसाठ हजार तीनशे रूपये फक्त )किंवा प्रत्यक्ष होणारा खर्च RE13A153 इ. १० वी व इ.१२ वी विद्यार्थी परीक्षा शुल्क भरणे या अर्थशिर्षकाच्या तरतूदीमधून खर्ची टाकणेस.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र.१०७०**

पुणेमहानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या २३ गावांतील मौजे खराडी गावाचे नगर भूमापन (सिटी सर्व्हे ) करून घेणेकामी मा. उपसंचालक, भुमी अभिलेख, पुणेप्रदेश, पुणे यांचे मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद केलेल्या संदर्भांकित पत्रान्वये नगर भूमापन

कामाचा खर्च र.रू. ४०,२४,९९६/– अधिक चौकशी कामाचा खर्च र.रू. ४३,७५,९००/– असे एकूणर.रू. ८४,००,८९६/–मा. जमाबंदीआयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य )पुणे या कार्यालयाचे पी.एल.ए खात्यावर (SBI, Treasury Branch, Pune, a/c no. 00000038306827364 ) अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शआ/८३४, दि. ९/११/२०२२ चे पत्र.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

**विषय क्र. १०७१**

पुणे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रिय कार्यालये, आरोग्य केंद्रे (दवाखाने), जलकेंद्रे, सांस्कृतीक केंद्रे, क्रीडांगणे,स्मशानभुमी, मंडई, माध्यमिक विद्यालये, कचरा हस्तांतरण केंद्र, मैलापाणीशुद्धीकरण केंद्र, उद्याने वस्ती गृह इत्यादी ठिकाणी' बहुद्देशीय कामगार' पुरविणे कामाची निविदा क्र. २०२१/०१ ची मुदत दि. ३१/८/२०२२ रोजी संपत असल्याने व निविदा क्र. २०२२/०१ ची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सुरक्षा/८४१, दि. १०/११/२०२२ चे पत्र.

१. दि. १/०९/२०२२ पासून नविन वर्क ऑर्डर देईपर्यंत मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस प्रा.लि. संस्थेसमवेत करारनामा करून काम करून घेणेस.
२. मे. शासनाकडून किमान वेतनदर व विशेष भत्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या वाढीसह संबंधितांना बिले आदा करणेस.
३. सदर कालावधीतील बिलेसन २०२२–२३ मधील अंदाजपत्रक अर्थशिर्षकामधून बिले आदा करणेस.

**निर्णय – सदर विषय मान्य करणेत येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**सही /– xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दिनांक २३/१२/२०२२ रोजी वृत्तांत मंजूर.**

**सही /– xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**